ISSN No. 2394-9996

New Vision

# New Vision

## Multi-disciplinary Research Journal

January 2017

Online version : http://www.milliyaresearchportal.com

Anjuman Ishat -e- Taleem Beed's
Milliya Arts, Science & Management Science College,
Beed- 431122 (Maharashtra)
Website : www.milliyasrcollege.org
E-mail.ID : newvisionjournal@gmail.com

| Sr. No. | Title of Research Paper | Author | Sub | P.No. |
|---|---|---|---|---|
| 14 | अल्मा कबूतरी में चित्रित संघर्षशील नारी | प्रा. डॉ. चित्रा धामणे | हिंदी | 54 |
| 15 | विज्ञापन में नारी का अस्तित्व | प्रा.आहेर संगीता एकनाथराव | हिंदी | 57 |
| 16 | विकलांग-विमर्श कारण तथा चुनौति | डॉ. ओमप्रकाश बन्सीलाल झंवर | हिंदी | 60 |
| 17 | 'जनता का मोर्चा' नाटक में साम्प्रदायिक सद्भाव एवं राष्ट्रीय एकात्मता | प्रा. संतोष नागरे | हिंदी | 64 |
| 18 | धूमिल के काव्य में जनवादी चेतना | डॉ. सय्यद अमर फकिर | हिंदी | 67 |
| 19 | 'जीवन हमारा' में व्यक्त शोषण, दमन और रूदन | प्रा. प्रकाश गायकवाड | हिंदी | 71 |
| 20 | शांता शेळके यांची भाषाशैली | डॉ. सरकटे सदाशिव | मराठी | 75 |
| 21 | 'संभूती' कृषी जीवनाशी निगडीत स्त्रीच्या जीवनातील फरफट रेखाटणारी कादंबरी | स.प्रा. ढास रवींद्र | मराठी | 81 |
| 22 | दलित साहित्यातील मानवता | प्रा. नामदेव शिनगारे | मराठी | 84 |
| 23 | दौलताबाद शहराचे महत्त्व | डॉ. शेख कलीम मोहियोद्दीन | इतिहास | 89 |
| 24 | मुक्ती संग्रामातील योध्दा | प्रा. हुसेन ईमाम<br>प्रा. मोहन जगन्नाथ काळकुटे | इतिहास | 92 |
| 25 | नवभारत निर्मितीत स्वामी विवेकानंदाचे शक्तीदाय विचार | प्रा. श्रीमती सुनिता शंकरराव कुरूडे | इतिहास | 94 |
| 26 | सामाजिक समायोजनामध्ये वर्तन एक महत्त्वपूर्ण घटक | प्रा. मलेका शाहिन अब्दुल गफार | गृह विज्ञान | 98 |
| 27 | " सावित्री फुलेंचे स्त्री चळवळीतील योगदान व आजची महिला " | प्रा. जाधव एस.बी. | गृह विज्ञान | 100 |
| 28 | "संत साहित्यातील आहार विचार " | डॉ. शिल्पा खोत-देशपांडे | गृह विज्ञान | 104 |

ISSN No.2394-9996

# मुक्ती संग्रामातील योध्दा

* प्रा. शेख हुसेन ईमाम
(इतिहास विभाग)
मिल्लीया महाविद्यालय, बीड.

प्रा. मोहन जगन्नाथ काळकुटे
(इतिहास विभाग प्रमुख)
प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय,
नेकनूर ता. जि. बीड.

**प्रस्ताविक:**

विठ्ठल काटकर यांचा जन्म बीड पासून जवळच असलेल्या पिंपळनेर या गावी दि. २३ ऑगस्ट १९३१ रोजी झाला. प्राथमिक शिक्षण पिंपळनेरला घेतले आणि वयाच्या १४ व्या ते चौथी पास झाले याच काळात, गोविंदभाई श्रॉफ यांच्या अध्यक्षतेखाली पिंपळनेरला भरलेल्या स्टेट कॉंग्रेसच्या अधिवेशनातील काशीनाथ जाधवांचा प्रभाव काटकरांवर पडला. काशिनाथ जाधवचे धाडस आणि प्रभावी व्यक्तीमत्वाने ते भारावून गेले आणि आपण ही देशकार्य करावे असा त्यांनी निश्चय केला. मात्र घरातील वातावरण धार्मिक आणि सनानणी होते.

त्यामुळे त्यांच्या वडिलांनी देशकार्य करणाऱ्याचा विरोध केला. मात्र मनाचा निश्चय पक्का असल्याने वडिलांचा विरोध पत्कारून बीडला पोहचले. तेथून परभणीला जाऊन महाराष्ट्र परिषदेच्या श्रीनिवास बोरीकर यांच्या नेतृत्वाखाली काम करण्यास सुरूवात केली तेथून ते जालन्याला गेले तेथेही ते समाधान मिळेन म्हणून मित्राच्या गावी टाकळगव्हाणला गेले आणि मित्राच्या सल्ल्याने तेथे शाळा सुरू करून शैक्षणिक कार्याला प्रारंभ केला. भारत देशाला स्वतंत्र मिळाले तेंव्हा हैद्राबाद संस्थान भारतात विलीन झाले नाही. त्यामुळे निर्माण झालेल्या मुक्तीसंग्राम चळवळीत काटकाशनी भाग घेतला आणि सहकाऱ्याच्या मदतीने पाडळसिंगीमधील पोस्ट ऑफीस जाळले. मादळमोहीतील शंभरापेक्षा जास्त शिंदीची झाले तोडली नंतर त्यांनी शिरापूरला पटवारी आफीस जाळले. पुढे डोंगरकिन्ही कॅम्पवर जाऊन काशिनाथ जाधवांनी नेमून दिलेल्या गटाचे नेतृत्व करून चकलांबा पोलीस चौकीवर बॉम्ब टाकण्याचे काम केले. ते काम फत्ते झाल्यानंतर काशनाथ जाधवांनी तयांचे कौतूक केले. त्यामुळे काटकरमधील नवचैतन्य संचारले. त्यांनी लगेच आळणगांव कॅम्पचे प्रमुख श्रीनिवास खोत व त्यांचे सहकारी व पाथर्डी कॅम्पचे क्रांतीकारक अशी ४० लोकांची तुकडी करून आष्टी तालुक्यातील वाघळूजच्या पोलीस चौकीवर हल्ला करण्यासाठी काटकर निघाले अंधारी रात्र, डोंगरी रात्र, डोंगरी रस्ता आणि पावसाची झिमझिम अशा परिस्थितीत सर्वजन वाघळून पोलीस चौकीजवळ पोहोचले आणि केवळ १०० फुटावरून काटकरांनी चौकीवर बॉम्ब फेकून आठ निजामी पोलीस ठार केले या वेळी नांगरटीत झोपलेल्या काटकरांच्या अंगावरून बंदूकीच्या गोळ्या जात होत्या. मात्र त्यांना सुदैवाने गोळी लागली नाही. ही उल्लेखनीय बाब आहे. या घटनेचा परिणाम होऊन बीडवरून पोलिस क्रांतीकारकांच्या मागे लागले. बेलतुरी या गावी क्रांतीकारक आणि पोलीसांच्या झालेल्या हल्ल्यात देवराव उगलमुगले हुतात्मा झाले.

गेवराई तालुक्यातील पाथरवाला या गावी रझाकारांनी लोकांना जगणे नकोसे केले होते. हा जुलूम नष्ट करण्यासाठी विठ्ठलराव काटकर, उध्दव गिरी, सोनाजी गायकवाड व इतर पोलिसांचा वेश धारण करून तेथील त्रास देणाऱ्या पठाणांना काटकरांनी गोळ्या घालून ठार केले नंतर पाथरवाला गावातील लोकांना निजामाच्या हद्दीतून बाहेरच्या ठिकाणी सुरक्षितपणे हलविण्याचे काम केले. पाथर्डी कॅम्पवरील क्रांतीकारकासाठी निजामी पोलिसांच्या वेशात जाऊन काटकर धान्य गोळा करत असत. पिंपळनेर पोलीस स्टेशनवरील हल्ल्याचे सुत्रधारही काटकरच होते. त्यांनी धनगर जवळका येथील करोडगिरी नाका जाळला होता.

अशा प्रकारची अनेक छोटी मोठी कामे काटकरांची चालुच होती. त्यातच १७ सप्टेंबर १९४८ ला पोलीस ॲक्शन होऊन हैद्रबाद संस्थान भारत देशांत विलीन झाले. पाथर्डी कॅम्पवरचे कार्य बंद झाले आणि सर्व क्रांतीकारक आपआपल्या घरी परतले, विठ्ठलराव काटकरांचे वैयक्तिक जीवन मात्र अतिशय खडतर गेले. १९५० नंतर त्यांनी पुणे, नाशिक, कोल्हापूर, लातूर, बीड, औरंगाबाद, सोलापूर अशा वेगवेगळ्या ठिकाणी पोट भरण्यासाठी फिरले मात्र त्यांना कुठेच समाधान लाभले नाही. त्यातच १९६० ला (आर्य समाज) आर्य समाजाने त्यांच्या आंतरजातीय विवाह घडवून आणि कालांतराने दोन अपत्येही झाली. मात्र पहिला मुलगा मरण पावला त्यावर काही दिवसांनी पत्निही निधन झाले आणि धाकट्या मुलास त्यांचे सासरे घेवून गेले. अशा पध्दतीने वारंवार संकटे एका मागून एक येतच राहिली. नंतर त्यांनी पुण्यात पंधरा वर्षे कलासागर फोटो स्टुडियोत नौकरी केली आणि हाल अपेष्टात दिवस काढले. मात्र देश सेवेची फुशारकी कधीही मारली नाही. खरोखरच त्यांचे कार्य पाहून कोणाच्याही मनात आदर निर्माण झाल्या शिवाय राहणार नाही. अशा झुंजार सिंहाने १४ नोव्हेंबर २००७ ला जगाचा अखेरचा निरोप घेतला.

**संदर्भ सूची :**

१. स्वातंत्र्य सैनिक विठ्ठलराव काटकर, यांची प्रा. मोहन काळकुटे, यांनी घेतलेली प्रत्यक्ष मुलाखत दि. १२.०१.२००७.

ISSN-2320-4[illegible]9
RNI No.MAHAUL03008/13/2012-[illegible]
UGC Approved

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Refereed Research Journal
**VOLUME : I ISSUE XIX Jul.- Sept. 2017**



UGC Approved Sr.No.45681

ARTS | COMMERCE | SCIENCE | AGRICULTURE | EDUCATION
MANAGEMENT MEDICAL | ENGINEERING & IT | LAW | PHARMACY
PHYSICAL EDUCATION | SOCIAL SCIENCE | JOURNALISM

Editor
**Dr. Sadashiv H. Sarkate**
E-mail : powerofknowledge3@gmail.com
www.powerofknowledge.co.in

| | | | |
|---|---|---|---|
| २४ | Study of Mental Health and Life Satisfaction of Ageing People | Dr. Ajit Chandanshive | ७६ |
| २५ | A STUDY OF EFFECTS OF CIRCUIT TRAINING AND YOGA ON THE PSYCHOLOGICAL EFFICIENCY OF NATIONAL KARATE PLAYERS | Anil Prabhatrao Mirkar<br>Prof. Dr. P.R. Rokade | ७९ |
| २६ | Women Police | Atul Ashok Chaudhari | ८२ |
| २७ | Religious Pluralism and Identity problem in India | Mr. Shaikh Gafoor Ahmed | ८४ |
| २८ | Indian Muslims: Political Ideology and interreligious harmony | Dr. Farooqui Quayyum M. Younus | ८९ |
| २९ | 21 st Century's Hindi Poetry and Woman Life ( With Particular reference to Sunita Jain) | Vaishali S. Rokade,<br>Kaminee A. Ballal | ९४ |
| ३० | १८५७ च्या राष्टीय उठावात मुस्लीम महिलांचा सहभाग एक - अभ्यास | प्रा. शेख हुसेन इमाम | ९७ |
| ३१ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील ग्रंथालयाच्या स्थितीचा आढावा | संदिप गोरख साळवे | १०[illegible] |
| ३२ | प्रयोगवाद तथा नयी कविता में प्रगतशील चेतना | प्रा. डॉ. गिरी डी.व्ही. | १०५ |
| ३३ | साहित्य, समाज और हिंदी सिनेमा | डॉ. प्रा. ए. जे. वेवले | १०९ |
| ३४ | Childhood Is Another Name Of Learning Process Concept Formation And Development | Dr.Jyotsna S. Pusate | ११२ |
| ३५ | सूफी संप्रदाय तत्त्वविचार | टकले गणेश प्रल्हादराव | ११५ |
| ३६ | यशवंत मनोहर व ज.वि.पवार यांचा दलित काव्यत्मक दृष्टीकोण | डॉ. बाळासाहेब बाबुराव लिहिणार | ११७ |
| ३७ | ममता कालिया के दौड उपन्यास में भौतिकता की प्यास . | डॉ. प्रा. शिवाजी सागोळे | १२१ |
| ३८ | दलित कविता: सामजिकतेचे भान | प्रा. डॉ. वैशाली सू. रोकडे | १२५ |
| ३९ | Existing Literature Review on Problem Faced by Women Entrepreneurs in India | Dr. Syed Tanvir Badruddin | १२९ |
| ४० | DEMAND: INTERPLAY OF ABILITY AND PREFERENCE | Gaurdas Sarkar | १३२ |
| ४१ | Emerging Issues and Challenges before Women Entrepreneurs in India | Dr. Chandrakant W. Gajewad | १३८ |
| ४२ | A Study of changes in Tax Rate for Assessment Year २०१७-१८ | Dr. V. S. Kshirsagar | १४१ |
| ४३ | फास्टफुडचा (असंतुलित) युवा वर्गाच्या आरोग्यावर होणारा प्रभाव : एक समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा.भिमराव पुंडगे, प्रा.डॉ.यशवंत चव्हाण | १४४ |
| ४४ | माहितीचा अधिकार अधिनियम २००५ : प्रचार व प्रसार होण्याची गरज | प्रा. दिलीप गोविंदा पाटील | १४८ |
| ४५ | ग्रामीण साहित्याची चळवळ | प्रा. डॉ. उमेश चांगदेव मुंढे | १५० |

# १८५७ च्या राष्ट्रीय उठावात मुस्लीम महिलांचा सहभाग एक -अभ्यास

प्रा. शेखा हुसेन इमाम
इतिहास विभाग
मिलीया महाविद्यालय, बीड

प्रस्तावनाः

१८५७ चा समर किंवा स्वातंत्र्य तसेच इंग्रजांच्या विरोधात झालेले प्रथम बंड किंवा उठाव होय.परकिय शक्तीच्या विरोधात झालेला हा पहिलाच उठाव होय. या उठावात सर्व जाती धर्माचे लोक सामील झाले होते.यात काही संधी साधू संस्थानिक व जमीनदार अमीर उमराव इंग्रजांच्या बाजूने होते. व्यापक स्वरूपाचा इंग्रजांना प्रतिकार प्रथमच होत होता. १८५७ च्या उठाव हा भारतीय स्वातंत्र्याचे युध्द नव्हते, ते केवळ शिपायाचे बंड होते असे पूर्वग्रह दुषित इंग्रज लेखकांनी लिहून ठेवले आहे.यात काही आर्शर्चय नाही. भारत जो पर्यंत इंग्रजांचा गुलाम होता तो पर्यंत अनेक हिंदी लेखकांनीही इंग्रज लेखकांचीच री ओढली आहे.

०१) महिलांनी धिक्कार केलाः

१८५७ च्या घटनाचा वृतांत जे. सी. विल्सन याने लिहीले की महिलांनी हिंदू शिपायांचा जो धिक्कार केला तो पुढील प्रमाणे होय. शहरात जेथे शिपाई तेथे महिलांनी त्यांच्या धिक्कार केला. ते असे बोलले की, तुमचे बंधू तिकडे तुरूगात पडले असता,तुम्ही बाजारात माशा मारतात.तुमचा धिक्कार असो, तुमच्या जगण्याला कहीच अर्थ नाही. महिलांचे हे बोलने शिपायांना झोंबले. १० मे ला त्यांनी उठाव केला. इंग्रजांची घरे जाळली. तुरूंग फोडून आपल्या सैनिकाला बाहेर काढले. सदर बाजाराची लुट केली. हातात स्वातंत्र्याचा हिरवा ध्वज उभारला.

१८५७ च्या उठावाचा प्रसार भारताच्या ब-याच प्रदेशात पसरला होता.उदाहरणार्थ कानपूर, झाशी, अवध, लखनौ, दिल्ली, बिहार या क्षेत्रात जास्त प्रभाव होता. मेरठच्या बराकपूर छावणीत वीर मंगल पांडेच्या बलिदानाने १८५७ च्या स्वातंत्र्य युध्दाला प्रारंभ झाला होता. मेरठच्या शिपायांनी बंड केले. यानंतर अवधमध्येही क्रांतीचा भडका उडाला. अवधच्या क्रांतीचे नेतृत्व बेगम हजरत महल आणि मौलवी अहमदशहा करत होते.

हजरत महल ही एक उत्तम प्रशासक म्हणून सिध्द झाली. हे सत्य आहे की, राणी लक्ष्मीबाई सारखे रण कौशल्य तिच्यात नव्हते.मात्र संघटन कौशल्यात राणी पेक्षा कमी नव्हती. हजरत महलनेच हिंदू-मुस्लीमांना समान वागणूक देउन कोणताही भेदभाव न करता दोन्ही जातीतील लोकांना महत्वाच्या पदावर नियुक्त करून हिंदू-मुस्लीमात भेदभावची निती नष्ट केली.हजरत महल ही बुध्दीमान स्त्री होती.ती आपल्या सैनिकाचा उत्साह वाढवण्यासाठी युध्द भूमिवर पोहचत असे. लखनौमध्ये ब्रिटिश फौज मजबुतपणे उभी होती. तिकडे क्रांतीकारक शौर्याने सामना करत होते. सार शासनाकडे हेनरीने युद्धाच्या पूर्ण तयारीत होती. क्रांती बंडखोरोच सेना त्याच्यासमोर टिकु शकत नाही.

इंग्रजांचे आक्रमकता पाहून हजरत महल लखनौ शहराला तरबंदी बांधण्यासाठी ५ लाख मंजूर केले होते. त्यास जेंव्हा माहीत झाले की नेपाळच्या राजा जंग बहादूरला गोरखपूर वे अवध का काही प्रांत देऊन आपल्याकडे वळवून घेतात. यावरून तिच्या कल्पकते विषयी कल्पना येते. त्याने इंग्रजांच्या बाजूने सामील झाले होते. अमृतलाल नागर लिहीतात की बेगम हजरत महलने सुध्दा राणी लक्ष्मीबाई प्रमाणे महिलांची एक सैनिक संघटन तयार केले. महालातील दासी स्त्रया यांच्या अभ्यासकरत तिने हिरगिरीसाठी सुद्दा स्त्री नियुक्त केल्या होत्या. तिने जवळपास पावनेदोन वर्ष अवधच्या प्रांतात क्रांतीची प्रज्वलीत ठेवली.

थोडक्यात म्हणजे इतिहासकांराने या स्वातंत्र्य संग्रामशिवायी खुप काही लिहीलं अवधच्या बेगमा विषयी इतिहासकारक लिहीतात की बेगमांनी नेहमी आठवणीत राहील अशी खुप सोडून गेली. या परीवारातील गाझीउद्दीन हैदरची पत्नी बादशहा बेगम आणि बंडखोराची निगरानीत ह. महलच्या क्रांतीकारकांनी प्रवेश केले होते. जी स्वभावाने अतिशय मवाळ वहिजर असे हाही अतिशय दृढ संकल्पीय पत्नी होती. असे सरजदूनाथ सरकार तारिख बदशहा बेगम यां ग्रंथाचा प्रस्तावनेत लिहीतात. हजरत महल इंग्रजांशी लढता लढता अत्यंत थकली होती. तिला भारत सोडून निवांत ठिकाणी नेपाळमध्ये जावेसे वाटत होते. तिने नेपाळ राजा जंग बहादूर याची अभ्यास गेले तेथे ह. महलने एके महल कदीबाग या नावाने बांधला. भारतीय स्वातंत्र्यासाठी घटक केंद्र म्हणून उदयास आले. या बागेतच १८७४ मध्ये ती स्वर्गवासी झाली. नेपाळला पोहचून तिने जाहीर केले होते की ये भारत के आजादी की लढाई की समाप्ती नहीं आरंभ है। हे निदं स्वातंत्र्य १९४७ मध्ये सतप्रतिशत खरे ठरत ती १९४७ पर्यंत देशप्रेमी भारतीयांच्या मनात नेहमी प्रज्वील राहीली काट मांडून हजरत महलची कबर फर्याद करते की, भारतीय स्वातंत्र्य भारतीयांना या महाल योध्दाविषयी गर्व आहे. तिच्या कर्तृत्वाने जनरल बक्त खान, तात्याटोपे नानासाहेब पेशवे, असे सरदार आणी रसेसेन, जगदनाथ सरकार सारख्या इतिहासकारकांची मने जिंकली. ती भारतात हिन्दू - मुस्लिम ऐक्याची पताका होती १८५७ चे स्वातंत्र्य संग्राम एक असा जनविद्रोह होता. ज्यात बादशहा त्यांच्या राजा अमीर उमराव राजे राजवाडे हे विशेष लोकच नव्हे तर आम जनता ही इंग्रज तानेशाही पासून सुटका मिळण्यासाठी रण मैदानात आरसे होते. त्या असंख्य देशप्रेमी लोकांचे बलीदान सहास आणि विरताच्या असमरनीय उदाहरण प्रस्तुत केले. याला भारताचा इतिहास हजारो वर्ष विसरणार नाही याला संग्रामात अनेकांचा बालीदान गेले.

**२) सब्जपोश औरत (हिरव्या पोशातील स्त्री)**

त्याकाळातील अभूतपूर्व विरतेची शौर्यांचे उत्तम उदाहरन म्हणजे हिरव्या पोशाख घालून घोड्यावर स्वार होती शहरातील लोकांना जिहादसाठी आव्हान करीत आणि एक नारा देत "आओ चलो खुदाने तुम्हे बर्क्षीस मे बुलाया है।" म्हणजे इश्वराने तुम्हाला स्वामीत्व नियोजीत केले आहे. शहरतील लोक ही तिचे साहस पाहून टोळयाच्या टोळया तिच्या पाठीमागे त्यांना घेऊन ती शत्रुवर तुटुन पडत ती स्वत: तलवार बंदूक चालवित काही लोक पडून गेल्यावर ती मैदानात खंबीरपणे उभे राहात. काही प्रत्यक्षदर्शी लोकांचे म्हणजे आहे की, ती तिच्यात अदभूत सहास होते. ती मृत्यूला घाबरत नव्हती. बंदुकीच्या गोल्यालाने भिताती बहादूर शिपायांप्रमाणे पुढे जात तिची हिंमत पाहून शहरातील लोकांतही उत्साह निर्माण होत. तिच्या वैयक्तिक जीवनाविषयी कोणाला कल्पना नव्हती. ती जुलै महिन्यामध्ये इंग्रजांशी लढतांत जखमी होऊन ती खाली पडली. इंग्रजांनी तीला कैद करून अंबाला येथील डिप्टी कमीशनरकडे पाठवले. अंबाला कैदेत असतांना या स्त्रीचे पुढे काय झाले त्यावर कुठले संकट कोसळले याचा थांगपत्ता लागत नाही. एवढे मात्र खरे की हडसन सारखा मोगल शहाजदे याचा खून करणारा व्यक्ती ही या स्त्रीची स्तुती करण्यात विवश होता. दिल्लीची ही महिला हिंन्दूस्थानची जून ऑफ आर्क यानावाने ओळखले जाते. इतिहासकारांनी या स्त्रीच्या शौर्याकडे ही दुर्लक्ष केले. या स्त्री संबंधी विशेष माहिती उपलब्ध होत नाही. मात्र लेफ्टीनंट हडसन याने या स्त्रीला कैद करून अंबाला कडे पाठविलेच एक पत्र ही डिप्टी कमीशनरच्या नावाने पाठवले होते. या पत्रात हडसनने या स्त्री विषयी तिच्या शौर्या विषयी ती क्रांतीकारकांना कशी प्रेरीत करीत होती. सर्व लोकांना एकत्रीत करून ब्रिटीश फौजेवर कशी हल्ले करीत होती. या स्त्री विषयी त्याने सविस्तर वृत्तांत आपल्या पत्रात पाठवले हडसनचे हे पत्र जंगे आजादी १८५७ लेखक खुर्शीद मुस्तफा रिझवी याने छापलेले आहे.

**३) बेगम जिनत महल :-** १८५७ च्या राष्ट्रीय उठावात, जिनत महलची महत्त्वपूर्ण योगदान आहे. जिनत महलने झाशीची राणी व हजरत महल प्रमाणे प्रत्यक्ष रणगणावर उतरली नसती तरी तिच्यात अभूतपूर्व सहास होते. त्याची समज

असाधरण क्षमता ही गुण त्यात होते. महत्त्वाचे म्हणजे सम्राट बहादूर शहा जफरला अत्याचारी इंग्रजांच्या विरोधात स्वातंत्र्य संग्रामाची नेतृत्व करण्याची पत्नी होती. हिच्यात उत्तम प्रशासकाचे गुण होते. ती ही स्वातंत्र्यासाठी धडपडतच होती. ब्रिटीश प्रशासनाचे लोक त्रस्त झाले होते. याच काळात बराकपूर धावणीत मंगलपांडेने आपल्या प्राणीची आहूती देवून क्रांतीचा सुभारंभ केला. हा वनवा लवकरच करनपुर, बनारस, अवध मेरठ पर्यंत परसला. अशा परिस्थितीत अनेक राजे महाराजे सवतंत्र्य बसले होते. बहादूरशहा जफर वृध्द झाले होते. ते नेहमी शेरशायरी मध्ये मग्न रहात. ते इच्छा असून ही या संग्रमात भाग घेण्यास मागेपुढे करत होते.

मेरठच्या बंडखोरांनी दिल्लीकडे कुच केले. याच प्रवासे अवध रोहीलखरेचे सैनिकही मोगल दरबारात पोहचले. मोगल बादशहाला विनंती केली की "जहापनाह हम ब्रिटीश हुकुमत को खत्म करन है।" सैनिकांनी मोगल समुदायाला आर्शिवाद देते व नेतृत्व करण्याची प्रार्थना केली. सांगितले की कुठ लिही चिंता करून का आम्ही इंग्रजांचा खजिना लुटून रिताकोश भरून देवू सैनिकांच्या या प्रार्थनेकडे सम्राटाने लक्ष दिले नाही. काही विश्वास घतकी दरबारी लोकांनी सम्राटाने नेतृत्व रद्द करून नये असे त्याना वाटत होते बेगम पडद्या मागुन सैनीकांचा संवाद ऐकत होती. बादशहाच नकारात्मकता पाहू ती दुःखी झाली. ज्या प्रमाणे शांतीच स्त्री आपल्या पतीव पुत्रांना युध्दात भाग घेण्यासाठी प्रेरित करते. क्ष्याच प्रमाणे राणीने राजाला प्रेरित केले. आणी पतीला म्हटलकी बहादुर शहा राजाने आत ही वेळ शेरशायरी करण्याचा नाही. नाना साहेबांचा संदेश आला आहे. त्यांच्याकडून सैन्य येत आहे सैन्याचे लक्ष दिल्लीकडे लागते आहे. आपले कर्तव्य आहे की, आपण त्यांचे अन्यथा इतिहास तुम्हाला कधीच क्षमता करणार नाही.

हे ऐकताच बहादुरशहा जफर उठून मोठ्याने म्हटले की फिरंगीओं ने इतने जुल्म ढाए है की हरतरफ कोहराम मचा हुआ है देशाचे लक्ष आता दिल्ली कडे लागले आम्ही आता जरूर लढू आता आमचे दैव मुल्कच्या दैवा बरोबर आहे. आणी म्हटले जो भी हो मंजुरे खुदा और हम कसम खाते है की गुलामीकडे की मौत नही मरेंगे बहादुर शहा जफरने निश्चय केला की इंग्रजांचा नामोनिशान ठेवणार नाही. त्यांनी हिंदू राजे व मुस्लिम नवाबाला आव्हान केले की, एकता ठेऊन अत्याचारी सरकारच्या विरोध करावा सर्वांना पत्र पाठवले आमचा एकच उद्देश फिरंगी सरकार नष्ट करने अनेक नवाबांनी राजावर बादशहाच्या पत्राचा काही परीणाम झाला नाही तरी निराश न होता जिनत बेगम ने बादशहाचे मनोबल कायम ठेवले. क्रांतीकारांचे इंग्रजांबरोबर दिल्लीत घमासान युध्द झाले. यात इंग्रजांना मागे हाटावे लागले सरकारी खजांना लुट अनेक बहादूर क्रांतीकारक शहीद झाले. मात्र पुढे अंतर्गत विश्वासघात असफल नेतृत्त्व रसदेचा अभाव यामुळे क्रांतीकारकाचे मनोबल कमी होऊ लागले अनेक योद्धांनी रन भूमी सोडली १९ सप्टे १८५७ रोजी बहादूर शहा जफरला लाल किल्यात नजर बंद केले. २५ सप्टेंबरला जिनत महल ही कैदी झाली या दोघांना लाल किल्यात नजरबंद ठेवले. २७ जाने १८५८ रोजी यांच्यावर राजद्रोहाचा खटला चालवून यांना अजीवन कारावासाची शिक्षा दिली. इंग्रजांनी त्यांना रंगूनला रवानगी केली. इंग्रजांनी बहादुरशहाचा दोन मुलांना यापूर्वीच संपविले होते. त्यांचे कापलेले शिर रेशमी रूमालात बहादूर शहाकडे पाठवले हे पाहून बादशहाचे मन उदीग्न झाले. ७ नोव्हें बर १८६२ मध्ये बहादूरशहा जपुरला पंसाघात आजाराने बहादूरशहा जफरने जगाला निरोप दिला. डेव्ही केप्टन डेन्हीसच्या मते जिनत महल सुंदर सोजवल मध्यम उंचीची महीला होती. पडदयाच्या पाठीमागून बादशहाला सल्ला देत जिनत महलला अपराधी घोषीत करतांना सरकारने त्यांवर अनेक प्रकारे छळ केला. बेगमने या देशाच्या स्वातंत्र्यासाठी महालात निवासी विजनाचा त्याग केला होता तिचा हा त्याग कधी ही विसरता येणार नाही.

**४) मिर्जाई बेगम :** ही महिला अंतीम क्षणापर्यंत हजरत महल बराबर होती. ही इंग्रजासोबत ही शैर्याने लढत राहीली. जेव्हा लखनौचे क्रांतीकारीकांचा पराजय झाला. तेंव्हा ही महिला हजरत महलच्या सोबत राहून सैनिकांचा उत्साह वाढवत

होती. जेव्हा हजरत महल तुलसीपुरहून (गोण्डा) नेपालच्या नयाकोट येथे पोहचली तर ही पण तयांच्या सोबत होती. १८७९ मध्ये त्यांचा देहांत झाला.

**५) अजीजन :-** १० जुलै १८५७ ला जेव्हा अजीमुल्लाह खॉच्या नेतृत्वाखाली क्रांतीचा झेंडा फडकावला तेव्हा क्रांतीकारी पुरूषा बरोबर काही माहिला ही त्यात सहभागी झाल्या होत्या. त्यात अजीजन हया महिलेचे नाव ही त्यात सामील होते.

अजीजन देशांच्या स्वातंत्र्यासाठी आणि अत्याचारी इंग्रजाविरोधी लढत राहीली. नानासाहेब पेशव्यांनी जेव्हा लष्करी भरतीची घोषणा केली. तेंव्हा ही महीला आपले घरदार सोडून आपल्या सहकार्यासह मैदानात उतरली. तीने महीलांची एक छोटी फौज बनवली हाती. तिने प्रत्येक घराघरात जावून घोडेस्वारी आणि हत्यारे चालवन्याचे प्रशिक्षण ती देत असत. महिलांची ही एक छोटी फौज जखमी झालेल्या शिपायांना औषध आणि इतर साहीत्य पोहचविण्याचे व अजीजन करत होत्या. अजीजन चे जे कार्य होते. त्यामध्ये जासुसरी करने युद्द संबंधी सुचना जमा करून ते समविचारी माणसापर्यंत पोहचवण्याचे कार्य करत होती. अजीजन अशा पुरूषांना बांगड्या भरत असे जे युध्दापासून घाबरत असे. १८५७ या लढा अयशस्वी झाल्यानंतर अजीजनला एका कैदीच्या रूपात जनरल हयोलाकच्या समोर आणले गेले. ता तिचे सौदर्य पाहून दंग राहीला. त्याने अजीजना सांगितले की तुम्ही आपला अपराधचा स्विकार केला आणि क्षमायाचना केली तर तिच्यावरील आरोप परत घेवून तिला सोडण्यात येईल. पण अजीजन ने स्पष्ट शब्दात माफी मागण्यास नकार दिला. तेव्हा जनरल हयोलाक ने तिला विचारले की आपला उद्देश काय आहे तेंव्हा ती म्हणाली की, "हरमुमकिन तरीके से ब्रितानी साम्राज्य का खात्मा" ऐवढे ऐकताच त्याने शिपायांना गोळीबार करण्याचा आदेश दिला आणि महीलांच्या रांगेत उभी असलेल्या अजीजन च्या शरीरात गोळयानी छन्नी छन्नी केली.

या लढ्यात हसीना खानम यांचे ही नाव समोर येथे पण त्यांच्या बद्दल फार जास्त माहीती उपलब्ध होवू शकली नाही. त्यांच बरोबर नानासाहेब पेशव्यांची मुलगी मीनाचा ही उल्लेख आढडून येतो. त्याच बरोबर त्यांच्या सोबत काही दासीचे ही नाव समोर येतात जसे ताज, बीबी, चन्दा खानम, गीती अफरोज, हुसैनी खानम हया सर्वांचे सर्व या लढ्यात मारले गेले.

**६) असगरी बेगम :** असगरी बेगम ही थाना भवन ची राहणारी होती. मुज्जफरपूरमध्ये त्यांच्या जन्म झाला तिने क्रांतीकारका सोबत राहून १८५७ च्या लढ्यात मोठ्या हीरीरीने भाग घेतला. तिचा जोश आणि उत्साह पाहून इतर ही हीला या संग्रमात सहभागी झाल्या. थाना भवनचे क्रांतीकारी नेता काझी अब्दुर्रहीम यांच्या त्या मातोश्री होत्या. १८५७ च्या लढ्यात फौजेशी केलेल्या लढ्यात पकडली गेली. इंग्रजांनी त्यांना जिवंत जाळले.

**७) हबीबा बेगम :-** जिल्हा मुज्जफर नगर उत्तर प्रदेशच्या एका छोट्या गावात १८३३ मध्ये हबीबा बेगमचा जन्म झाला. त्यांचा संबंध एक मुस्लीम गुजर परिवाराशी होता. इंग्रजांशी मुकाबला करण्याच्या गुन्हा तिच्यावर ठेवण्यात आला. तिला इंग्रजांनी अटक करून १८५७ मध्ये फाशीची शिक्षा दिली.

**८) रहीमी बेगम :-** हया तरूण महिलांचा संबंध एका मुस्लीम रजपूत परिवारशी होता. क्ष्यांचा जन्म उत्तर प्रदेशातील मुज्जफर नगर येथे एका छोटया खेड्यात झाला. भारताच्या प्रथम स्वातंत्र्यता संग्राम मध्ये फार मोठ्या प्रमाणात भाग घेतला. इंग्रजा विरूध्द लढ्याच्या गुन्हामध्ये अटक करून फाशी देण्यात आली. जवळपास २५५ महिला इंग्रज फौजेशी लढतांना शहीद झाली आणि तरूण महिलांना फासावर लटकवण्यात आले.[१०]

**९) फरहत जहाँ बेगम :** पुरूषी वेश धारण करून फरहत जहाँ बेगमने १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यात आपला सहभाग नोंदवला होता. तीने पुरूषांप्रमाणे पुरूषी वेश धारन करून इंग्रजांशी मुकाबला केला. त मोगल घराण्याची एक

नर्तकी होती. तीचा निवास लाल किल्यांत होता अस १८५७ च्या लढ्यात ती मेजर हॅडसनला ठार मारण्यासाठो शोधत होती. पण हडसननेच तिला गोळी मारून शहीद केले.

**१०) नाजनीन :-** १८५७ च्या राष्ट्रीय स्वातंत्र्य लढ्यात ही क्रांतीकारका बरोबर सामील झाली. तिला तलवार आणि बंदूक चालवण्याचे तिने चांगल्या प्रकारे प्रशिक्षण घेतले होते. म्हणून तिला क्रांतीकारकांनी लाल किल्याच्या भिंतीवर पहारा देण्यास उभे केले. तेंव्हा एक इंग्रज आणि एक शिपाई तेथे स्फोटके पेटत होते. तीने पहाताच त्या शिपायाला टिपले व त्या इंग्रजालाही आपले शिकार बनवले. नाजनीन बेगम ही लढता लढता आपल्या देशासाठो शहीद झाली.

**११) अलिया बेगम :** भारतातील आपआपसातील मतभेद आणि निराशाजन स्थितीमध्ये अवध मध्ये क्रांतीचा भावना प्रज्वलीत ठवणे हे अलिया बेगमचे ही काम होते. ८७ दिवसाच्या प्रदिर्घ लढ्यानंतर ही भारतीय लोक मुठभर इंग्रजांना पराजयाची धूळ चारू शकले नाही. पण अलिया बेगमने सैनिक प्रशिक्षण घेतले असते तर एक उत्कृष्ठ सेनापती बनली असती. आलिया बेगम ही नानासाहेब पेशवे आणि तात्या टोपे यांनी चालवलेली क्रांतीकारी गतीविधीच्या बरोबर आलिया बेगम आपले आंदोलन चालवत होती. जो पर्यंत तिने ब्रिटीश साम्राज्य विरूध्द लढा दिला.

१८५७ च्या स्वातंत्र्य संग्रमात ज्या महिलांनी सहभाग घेतला त्यांची नावे इतिहासात आपल्या दिसत नाही. पण येथे ते काही नावांचा उल्लेख झाला. त्यातुन असे स्पष्ट होते की आमच्या देशात नारी शक्तीला कोणत्याही परिस्थितीत कमी लेखता येणार नाही. क्रांतीकारी महिलांमध्ये बहादूरशहा जफरची मुलगी बस्ती बेगम, तसेच मुजफ्फर नगरची उम्दा बेगम आणि टीपु सुलतानाची समकालींन वेलुनाचिमार, दिल्लीचे राजपुत्र फिरोजशहा आणि त्यांची पत्नी बेगम जमाती बेगम यांनी जंगलात राहून सैन्य संघटन करून इंग्रजांशी लढा दिला.

**सारांश:** १८५७ च्या उठावात काही मुस्लीम महिला मुजाहीद्दीनी संबंधीत माहिती घेण्यात आली. ही काही नावे आहे की ज्यांनी आपआपल्या क्षेत्रामध्ये नायीकेची भूमिका निभावली कित्येकांना बंदूकिच्या गोळ्या घालून ठार करण्यात आले. काहींना कैदी बनवल्यात आले. काहींना फाशी देण्यात आली. तर काहींना जिवंत जाळण्यात आले. तरीही मुस्लीम महिलांनी ही आपली विरता देशासाठो सर्व काही त्याग करण्याची तयारी एक अदभूत सहास दाखवण्याचा प्रयत्न महिलांनी केला. महात्मा गांधी म्हटले होते की भारताचा स्वातंत्र्य संग्रामाचा इतिहास हा भारतीय महिलांचे वर्णन केल्या शिवाय पूर्ण होऊ शकत नाही. राणी लक्ष्मीबाईच्या व्यतिरिक्त अशा काही मुस्लीम महिला होत्या की त्या इंग्रजांचा द्वेष करत होत्या. आणि इंग्रजांच्या विरूध्दात पुरूषांना लढ्यासाठो उत्तेजनही देत होती. १८५७ च्या स्वातंत्र्य युध्दात या मुस्लीम महिलांनी आपली सरफरोशी त्याग आणि बलिदानाची एक वेगळी छाप सोडली आहे.

**संदर्भ सुची :**


१. एस.एस. नागरी / कान्ता नागरी भारत के मुस्लिम सेनानी पृ.क्र. पब्लिकेशन..

२. डॉ. आबीदा समीउद्दीन भारत के स्वातंत्र्य संग्राम में मुस्लीम महीलाओंका योगदान, उमेन्स कॉलेज अलीगढ युनिव्हर्सिटी अलिगढ.

५. मौलवी जकाउल्ला तारिखे उरूजे सल्तनत इंग्लीशया हिंन्द

८. जंगे आजादी १८५७ लेखक खुर्शीद मुस्तफा रिझवी.

९. भारत के मुस्लीम स्वातंत्र्यता सेनानी/एस.एल. नागौरी, कांता नागोरी, राज पब्लीकेशन हाऊस जयपूर,.

११. जंगे आजादी में मुसलमानों की कुर्बाणीयाँ हैदर अली नोमाजी दानिश बुक डेपो अंबेडकर नगर, उत्तर प्रदेश

१२. आज कल (साहित्य और संस्कृतीका मासीक संपादक योगेन्द्र दत्त शर्मा, सुचना भवन. सी.जी.ओ. कॉम्पलेक्स, लोधी लोड नवी दिल्ली.